Vol 6 Issue 11 Dec 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 11 | December - 2016

# शाहू महाराज ( थोरले) तथा पेशवे याचें पशु–पक्षी पालन धोरण.

प्रा.डॉ. सौ. निलीमा राऊत (कोहळे)
डॉ. पंजाबराव देशमुख कला वाणिज्य (सायम्)
महाविद्यालय, नागपूर.

**प्रस्तावना:**

पशुपालन हे आपल्या देशाच्या इतिहासात फार पूर्विपासून चालत आले आहे.

पशु–पक्षी पालनासबंधीच्या नोंदी असलेली कागदपत्रे शिवकाळात फारशी मिळत नाहीत. पेशवे काळात मात्र विशेषतः राजे आणि प्रधान यांच्याकडे असलेल्या पशुपक्ष्यांचे तपशील मिळतात, या शोधनिबंधात छत्रपती थोरले शाहू महाराज व त्यांचे पेशवे यांच्या पशुपालनासबधी उपलब्ध कागद पत्रावरून चर्चा करीत आहे.

छत्रपती शाहू, पेशवा सवाई माधवराव आणि अनेक सरदार अशा मातब्बर लोकांना शिकार खाण्याची मोठी हौस होती, ते आपल्या प्राणी संग्रहालयात विविध प्रकारचे पशु पक्षी संग्रहीत करण्याचे सतत प्रयत्न करीत असत. संग्रहालय समृध्द करण्यासाठी महाराष्ट्राच्या विविध भागातून, परप्रांतातून आणि प्रसंगी परदेशातूनही पशुपक्षी आणण्याचा त्यांना विलक्षण छंद होता.[1]

छत्रपती संभाजी पुत्र शिवाजी उर्फ शाहूराजे इ. स. 1708 साली मोगली कैदेतून सुटून सातारा येथे आले, शाहू राजे हे मोगली कैदेत असताना डोळे दिपवून टाकणारे मोगलाचे वैभव त्यांनी पाहिले होते. त्यामूळे त्यांच्या स्वभावावर मोगलांच्या विलासी वृत्तीचा परिणाम झाला होता. त्यातूनच ''शिकार'' हा छंद त्यांना लागला असावा. साता–याच्या आसपासच्या जंगलातून तें शिकार करीत, त्यासाठी घोडा आणि कुत्रा या प्राण्यांची गरज असे. जातीवंत कुत्री आणि घोडी आणण्यासाठी त्यांनी बुंदेलखंडापर्यंत जासूद पाठविले होते., तसेच काबूलहून ईराणी घोडा मिळविण्याचा प्रयत्न



केलेला होता.[2]

एका पत्रातून शाहू महाराज पेशव्यांना कळवितात ''––––– इराणी घोडयासाठी माणसे लाहोरात पाठविली आहेत. परंतू या दिवसांत काबलेकडून सौदागिरी घोडे आले नाहीत. ज्यास पाठविले आहे तो मार्ग पाहात बसला आहे. सौदागिरी आल्यावर एखादा घोडा उत्तमच खरीदी करून आणील.[3]

वरील पत्रावरून असे लक्षात येते की, त्या काळात इराणी जातीचे घोडे लाहोरहून आणले जात असत, तसेच काबूलहून घोडयांचे सौदागर (व्यापारी) माहाराष्ट्रा पर्यंत व्यापार करीत असल्याचे दिसते.

शाहू महाराजांच्या कुत्तेबाजाला एकदा समजले की, पुण्यात चिमाजी आप्पाकडे त्यांच्या कुत्रीस उत्तम पिल्ले झाली आहेत, त्याने चिमाजी आप्पास पत्र लिहीले, 'राजश्री राऊ तथा राजश्री आप्पास्वामीचे सेवेशी ––––– स्वामींची कुत्री पुण्यात उत्तम पीले जाले आहेत ते राजश्री स्वामींचे कुत्तेबाजानी पाहिले –––– स्वामींनी आज्ञा केली की, आप्पाचे कुतरीस पील उत्तम जाहले आहेत ते आणवणे–––––– कदाचित स्वामींची कुतरी नसिली तरी जवळपास दुसरी कोणाची असतील त्याची तहकीकात करून पाठवून द्यावी.[4]

इ. स. 1738 मध्ये बाजीराव पेशव्यांना पुरंदरे लिहीतात –––– विशेष 'स्वामीनी चवदा कुत्री पाठविली. परंतू राजश्री स्वामींच्या चित्तास आली नाही. –––– दोन मात्र घेतली. राजश्रींनी माघारी टाकीली. त्यापैकी एक पिसाळलेसे झाले ते सोडिले.[5]

वरील पत्रावरून छत्रपती शाहू महाराजांना शानपालनाचा छंद असल्याचे समजते. त्यावेळच्या कुत्राच्या जातीचा तसेच त्यांचे रंग, त्यांची पैदास व पिसाळलेले कुतरे बाजूस टाकले या उल्लेखावरून (रेबीज) रोगाची माहिती त्या काळी असल्याचे समजते.

आपल्या शिकारखान्यात वनगाई, कस्तुरीमृग आणि हुमे पक्षी असावेत असे कोणीतरी शाहू राजांना सांगितल्यावर ते पक्षी काश्मीरहून मिळविण्यासाठी जासूद पाठविण्याची व्यवस्था केली होती[6]

कर्नाटकातून हत्ती आणण्या करीता कारकून गलबंताची व्यवस्था केली होती.[7]

शाहूच्या शिकारखान्यात हत्ती, वाघ, चित्ते उंट, घोडे, कुत्री, बदके, कबुतरे वगैरे पशुपक्षी होते. उंट, हत्ती, घोडे अशा प्राण्यासाठी ते खूप पैसे खर्च करीत असत.[8] यावरून त्यांच्या हौसमौजेची कल्पना येते.

थोरले बाजीराव पेशवे यांनी पुण्यात सुरूवातीस पशुपक्षी पालनास सुरूवात केली. त्यांनतर नानासाहेब पेशव्यांनी त्याला विशेष स्वरूप दिले. पर्वतीच्या पायथ्या जवळच्या तळयाकाठी पेशव्यांचा शिकारखाना होता. सवाई माधवरावांच्या कारकिर्दीत या संग्रहालयाचे स्वरूप विस्तारीत आणि भव्य झाले. त्यात सिंह, वाघ, हत्ती, चित्ते, हरणे, गेंडा, उंट, घोडे, गवे, हरणे, ससे, पाणकोंबडया, बदके, कुत्री, पोपट, मैना, मोर कबुतरे असे कीतीतरी पशुपक्षी होते.[9]

पुण्यात पेशव्यांची स्वतःची पागा होती. त्यास हुजूरपागा असे म्हणत. तीत दहा हजार घोडे होते. हूजूरपागेत 52 पथके होती. नानासाहेब पेशव्यांचा एक एकरंगी (कुमेर) घोडा होता.[10]

नानासाहेब पेशव्यांच्या प्राणिसंग्रहालयाच्या मुख्य अधिका–यांचे नांव त्र्यबंक सदाशिव. त्यास एक अधिकारी लिहीतो –––– '' तीतर सुमारे वीस पाठविले आहेत, ते घेवून बागेत सोडावे. तीतर चार दिवाळीच्या बागात सोडले तरच राहातील व तमशा दिसेल, रमण्यात सोडले तर राहणार नाहीत'' ––––– माहुलीच्या किल्लेदार कर्णाजी शिंदे यास नानासाहेबांनी साबंरे, भेकरे, चितळे, रानडुकर, गवे यांच्यासाठी पत्र लिहीले.[11]

सुरत येथे काही चांगले पक्षी असल्याचे समजल्यावर

नानासाहेबं पेशव्यांना माधवरावांनी लिहीले की, ——————— '' सुरतेस शहाणा माणूस पाठवून बहिरी दोन, शाईन एक येणेप्रमाणे तीन खरेदी करून आणविणे.''

पेशव्यांच्या पुण्याच्या शनिवार पेठेत गोरवाना होता. तसेच हुजुरपागा, पीलखाना असे अठरा कारखाने समृध्द होते. गाई गुरासाठी राखीव गवतांची कुरणे, उसांचे मळे अनेक ठिकाणी होते.[12]

आनंदीबाईनी आनंदवल्ली हे गाव वसविले. तेथे राहत असताना तेथे आपला शिकारखाना उभा करण्यासाठी महादजी शिंघाकडून नानास पत्र पाठविले की, हरणे पुण्यातील टोक्याहून नेली ती सत्वर पाठवावी. श्रीमंतानी शागीर्द पाठविले आहेत.

दुस—या बाजीरावांचे कोथरूड, शनिवार वाडा, शुक्रवार, बुधवार येथील वाडयातील, शिकारखानेही सुंदर होते. त्याच्या संग्रहालयात मोर, सांबर, राघू, मैना, पोपट, चंडोल, कबुतरे असे नाजूक आणि सुंदर पक्षी होते. त्यांची खुराख आणि निगा मोठया दक्षतेने घेतली जात होती.[13]

सवाई माधवरावांच्या प्रेक्षणीय शिकारखाना पाहून मेजर प्रासींस आणि सर चार्लस मॅलेट यांनी सविस्तर वर्णन लिहून ठेवली आहेत. निरनिराळया प्राण्यांचे वस्त्रांलकार, वाघ आणि नृत्यगायनाच्या पार्श्वभूमीवर यांचे डौलदार वर्णन आणि रमणीय पदन्यास पाहून अतिशय खूष झाल्याचे त्यांच्या लिखाणावरून स्वष्टपणे जाणवते.[14]

गुरांची चांगली पैदास व्हावी म्हणून शेकडो गाई पेशव्यानी बाळगल्या होत्या.शनिवारवाडयात पश्चिमेस त्यांची स्वतंत्र गोशाळा होती., त्यासबंधी एका पत्रात नानासाहेब पेशवे कान्हेरे यांना म्हणतात हमन गाईचे प्रयोजन आहे ————— तर तरण्या देखण्या चांगल्या पाचशे ———— पाठवून देणे, विलंब ना लावणे.[15]

हत्ती उंट घोडे यांना खास सरंजाम असत. सणवार उत्सव समारंभ प्रसंगी त्यांना वस्त्रालंकारानी सजवीत असत. दस—याच्या मिरवणुकीत तर ते अधिक खुलुन दिसावेत म्हणून प्रयत्न करीत. झुलझालर पडदे पंखे अंबारी तकीये छत्र, निशाण, लगाम खोगीर तंजा जेरबंद पुजी फराकी अशा अनेक वस्तूंचा सरजांम असे. निरनिराळया विभागावर कुशल अधिकारी नेमलेले असत. आणि त्यांना चांगला पगार देत.[17]

पशुपक्ष्यांची पैदास व्हावी, त्यांचे संरक्षण व्हावे म्हणून भिमाशंकर सिंहगड कोकण कल्याण जेजुरी ते पुरंदर अशा विशिष्ट भागात शिकार करण्याला सक्त मनाई होती. हे भाग खास करून सांबर, हरणे, ससे, रानडुक्कर यांच्याकरीता राखून ठेवण्यांत आलेले होते.[18]

शिकारखान्यातील मासांहारी प्राण्याच्या करीता ताजेमांस विकत घेतल्याच्या नोंदी आढळून येतात. हत्ती हा शाकाहारी प्राणी असून त्याचा एकदर खर्च फार मोठा असे. एका हत्तीवर एका वर्षात 1735 रू. खर्च झाल्याची नोंद एका ताळेबदांत आढळून येते. यावरून प्राण्यांच्या खुराकांची किती काळजी घेत असत आणि अवाढव्य खर्च करीत असत याची कल्पना येते.

## *संदर्भसुची—*

1.गो. स. सरदेसाई (संपा) पेशवे दप्तरखंड 8, लेख 22, 27, 28, 29, प्रकाशन 1931ः ग. चि. वाड (संपा) सवाई माधवराव पेशवे रोजनिशी खंड क्र. 4, नोंद 116, प्रकाशन 1908
2.पेशवे दप्तर खंड 8, पूर्वोक्त, लेखः 14, 15, 16
3.ना. गो. चाफेकर, पेशवाईच्या सावलीत, पृ. 240 प्रकाशन 1937
4.ग. चि. वाड (संपा) शाहू रोजनिशी —1 नोंद 11, 12
5.कित्ता, नोंद 13, 14
6.पेशवे दप्तर खंड 8, पूर्वोक्त लेख 22, 24, 25
7.कित्ता, लेख 26, 27
8.गो. स. सरदेसाई (संपा) पेशवे दप्तर खंड 25 लेख 26, प्रकाशन 1932.
य. न.. केळकर ज्ञानेश्वर मासिक अंक 1 पृ.20, 21, 23, प्रकाशन 1975
9.गो. स. सरदेसाई (संपा.) पेशवे दप्तर खंड 22, पृ. 95, 119 प्रकाशन 1932
10.कित्ता पृ. 120, 121
11.गो. स. सरदेसाई (संपा.) पेशवे दप्तर खंड 30, पृ. 7, 74, प्रकाशन 1933
12.गो. स. सरदेसाई (संपा.) पेशवे दप्तर खंड 32 पृ. 37, प्रकाशन 1933
13.य. न. केळकर, दुस—या बाजीरावांचा शिकारखाना लेख पृ. 36 ते 38 फेब्रु. 1959.
14.पेशवे दप्तर खंड 30, पूर्वोक्त, लेख. 71
15.गो. स. सरदेसाई (सपा.) पेशवे दप्तर खंड 6, पृ. 16
16.पेशवे दप्तर खंड 32, पूर्वोक्त. 34, 35, 36
भा. इ. स. मं. त्रैमासीक वर्ष 9, अंक 1, पृ. 37, शके 1850
17.पेशवे दप्तर भाग 22, पूर्वोक्त पृ. 99, पेशवे दप्तर भाग 32, पूर्वोक्त पृ. 43
18.कित्ता
19.कित्ता पेशवे दप्तर भाग 22, पूर्वोक्त पृ. 46, 47

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org